देविंसू ट्रेडिंग लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १०२, मजला - १०, प्लॉट - २२०, मेकर चेम्बर्स ६, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१.
सीआयएन: L51900MH1985PLC036383
वेबसाइट: www.devinsutrading.com; दूरध्वनी क्र. ०२२ ४९६२ २७५४; ई-मेल: devinsutrading@gmail.com

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, नोंदवह्या समाप्ती आणि दूरस्थ ई-मतदानाची सूचना

ह्या द्वारे सूचना देण्यात येते कि, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेलं कामकाज करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता १०२, मजला - १०, प्लॉट - २२०, मेकर चेम्बर्स ६, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ येथे होईल.

सदर सूचना व त्याचबरोबर प्रॉक्सी प्रपत्र, उपस्थिती स्लिप आणि संचालकांचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि लेखापरीक्षित वित्तीय विवरण असलेला वार्षिक अहवाल, ज्यांचा इ-मेलचा पत्ता उपलब्ध आहे अश्या सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आले आहेत आणि ज्यांचा इ-मेल चा पत्ता उपलब्ध नाही अश्या सर्व सदस्यांना छापील स्वरूपात पाठवण्यात आले आहेत आणि ते कंपनीच्या वेबसाईट वर www.devinsutrading.com येथे उपलब्ध आहे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना बीएसइ लिमिटेड (बीएसइ) च्या वेबसाईटवर www.bseindia.com येथे आणि एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्या वेबसाईटवर www.instavote.linkintime.co.in येथे देखील उपलब्ध आहे.

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८, कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० सुधारित आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगशन्स अँड डिस्क्लोजर्स रीक्वायर मेंट्स) अधिनियम २०१५ मधील नियम ४४(१) अन्वये कंपनीने सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणा वापरून त्यांचे मतदान करण्यासाठी एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) द्वारा सुविधा दूरस्थ इ-मतदान व्यवस्था उपलब्ध करून देण्यात अली आहे आणि त्याद्वारे सदर मतदानाद्वारे कामकाज करता येईल.

दूरस्थ इ-मतदान कालावधी शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) वाजता सुरु होईल आणि रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० (भाप्रवेळ) वाजता संपेल. ह्या कालावधीत, सदस्य इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मतदान करू शकतील. त्यानंतर एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) द्वारा इ-मतदान यंत्रणा बंद करण्यात येईल.

सदस्यांचे मतदानाचे अधिकार हे दि. २८ जुलै, २०२५ रोजी ("अंतिम मुदतीची तारीख") कंपनीच्या भरणा केलेल्या इक्वीटी समभाग भांडवलात त्यांनी धारण केलेल्या इक्वीटी समभागाच्या प्रमाणात असतील. अंतिम मुदतीच्या तारखेला, कंपनीची सदस्य असलेली कोणतीही व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर, दूरस्थ इ-मतदान सुविधा वापरून किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करू शकेल.

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविण्यात आल्यानंतर एखाद्या व्यक्तीने कंपनीचे समभाग खरेदी केले आणि सदर व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि अंतिम मुदतीच्या तारखेला तिने समभाग धारण केले असल्यास, सदर व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर, दूरस्थ इ-मतदान सुविधा वापरून किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेत पद्धतीने मतदान करू शकेल. सदर व्यक्ती https://instavote.linkintime.co.in येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. परंतु, जर त्या व्यक्तीने अगोदरच लिंक इन टाइम यांचेकडे दूरस्थ मतदानासाठी नोंदणी केली असल्यास, विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्डचा मतदान करण्यासाठी उपयोग करता येईल.

ठरावावर मतदान करण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांना दूरस्थ इ-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले नाही असे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करू शकतील. ज्यांनी दूरस्थ इ-मतदान सुविधा वापरून त्यांचे मतदान केले आहे असे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतील परंतु ते पुन्हा त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

संपूर्ण ई-मतदानच्या प्रक्रियेची छाननी करण्यासाठी मि. हर्षद पुसाळकर, प्रॅक्टीसिंग कंपनी सेक्रेटरी ह्यांची स्क्रुटीनाईजर म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या मतदानाचा निकाल आणि स्क्रुटीनाईजरचा अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर म्हणजे (www.devinsutrading.com) आणि लिंक इनटाईम यांच्या वेबसाइटवर https://instavote.linkintime.co.in येथे उपलब्ध करून देण्यात येईल तसेच जिथे कंपनीच्या ईक्वीटी समभागांची नोंदणी केली आहे, अश्या बीएसई लिमिटेड ह्यांना पाठवण्यात येईल.

इ-मतदानासंबंधी काहीही चौकशी करायची असल्यास किंवा प्रश्नांसाठी, कृपया https://instavote.linkintime.co.in येथे हेल्प विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि इ-मतदान पुस्तिका पाहावी किंवा enotices@in.mpms.mufg.com येथे इ-मेल पाठवावे अथवा एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) ०२२-४९१८६०० काहीही तक्रार/समस्या असल्यास, सदस्यांनी मेसर्स एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट, यांच्याशी सम्पर्क साधावा.

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ९१ अन्वये, कंपनीचे सदस्यांचे रजिस्टर आणि समभाग हस्तांतरण पुस्तिका, मंगळवार दि. २९ जुलै २०२५ ते सोमवार दि. ४ जुलै २०२५ (दोन्ही दिवस समाविष्ट) ह्या कालावधीत ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठीच्या कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी बंद राहतील.

सभेला उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्ती, स्वतः मतदान करू शकतील किंवा सभेस उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेल्या विशीत प्रपत्राद्वारे / अधोकारप्रदान पत्राद्वारे सर्व प्रॉक्सिज कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या ४८ तास अगोदर जमा केल्यास प्रॉक्सी/अधिकृत प्रतिनिधींच्या द्वारे मतदान करू शकतील.

देविंसू ट्रेडिंग लिमिटेड करता
स्वाक्षरी/-
राजन सावंत
पूर्ण वेळ संचालक
डीआयएन: ०८५६२८४०

दिनांक: ९/०७/२०२५
ठिकाण: मुंबई

प्रपत्र क्र. ३
[नियम-१३(१)(ए)पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग,
सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

खटला क्र.: ओए/१४६०/२०२४

कर्ज वसूली न्यायाधिकरण (कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता ॲक्टच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स.

स्टेट बँक ऑफ इंडिया

विरुद्ध परि. क्र. ०९

कृष्णन पॉली प्रिंट्स ओझा

प्रति,

(१) कृष्णन पॉली प्रिंट्स ओझा, डी/डब्ल्यू/एस/ओ-महेश
गाला क्र. १३१, १ला मजला, दिवाण एन शाह इंड. इस्टेट, क्र. ६, नवघर रोड, वसई पूर्व, पालघर ४०१२१०, पालघर, महाराष्ट्र-४०१२१०.

(२) महेश नंदकिशोर ओझा,
गाला क्र. १३१, १ला मजला, दिवाण एन शाह इंड. इस्टेट, क्र. ६, नवघर रोड, वसई पूर्व, पालघर ४०१२१०, पालघर, महाराष्ट्र-४०१२१०.
येथे देखील :- ३०१, ऋषभ कृपा सीएचएस, जैन नगर, नवघर रोड, लोकमान्य शाळेजवळ, भाईंदर पूर्व, पालघर, महाराष्ट्र.

(३) राधिका महेश ओझा,
गाला क्र. १३१, १ला मजला, दिवाण एन शाह इंड. इस्टेट, क्र. ६, नवघर रोड, वसई पूर्व, पालघर ४०१२१०, पालघर, महाराष्ट्र-४०१२१०.
येथे देखील :- ३०१, ऋषभ कृपा सीएचएस, जैन नगर, नवघर रोड, लोकमान्य शाळेजवळ, भाईंदर पूर्व, पालघर, महाराष्ट्र.

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/१४६०/२०२४** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **०३/१०/२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ५३८४१२६.००/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;

(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **२४/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **रजिस्ट्रार**समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: ०७/०४/२०२५ रोजी दिले.

शिक्का

सही/-
समन्स जारी करण्याकरीता प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी
संजय जयस्वाल
रजिस्ट्रार
डीआरटी-III, मुंबई

टीप: जे लागू नसेल ते काढून टाका

जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, माझे अशिल सदर नमूद मालमत्ता खरेदी करण्याच्या उद्देशाने पुढे येत असून, मी खाली नमूद केलेल्या **(१) श्रीमती वंदना दिव्वेश शाह आणि (२) श्री दिव्वेश भरतकुमार शाह** यांच्या मालकीच्या मालमत्तेचा हक्क तपासणीच्या प्रक्रियेत आहे.

कोणत्याही व्यक्तीस सदर मालमत्तेबाबत विक्री, देवाणघेवाण, गहाण, देणगी, ट्रस्ट, भार, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, तारण किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या हक्काचा दावा असल्यास, त्यांनी हा दावा आवश्यक कागदपत्रांसह खालील दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात या सूचनेपासून १४ दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा, अशा व्यक्तीचा दावा हा स्वतःहून त्यागलेला/त्यागलेला/वर्ज्य केलेला मानला जाईल आणि त्यानंतर अशा कोणत्याही दाव्याची दखल घेण्यात येणार नाही.

सदर मालमत्तेचे विवरण

विंग अ ३ मधील ३२व्या मजल्यावरील अ ३-३२०७ क्रमांकाच्या सदनिकेचा, ज्याचे रेरा चटई क्षेत्रफळ अंदाजे १,१२१.७१ चौ. फूट असून सदनिकेच्या आत वापरासाठी ३९१.२३ चौ. फूट चटई क्षेत्रफळ, ज्यामध्ये गॅलरी, अंतर्गत लिफ्ट लॉबी, निच, अंतर्गत जिना व फुलवारी यांचा समावेश आहे, वापरण्याचा विशेष हक्क यासोबत आहे. सदर सदनिका 'स्काय फॉरेस्ट' नावाच्या इमारतीमध्ये स्थित असून, यासोबत पी ५ मजल्यावरील १३६ व १३७ क्रमांकाच्या दोन (२) कार पार्किंग जागा वापरण्याचा विशेष हक्क आहे. ही मालमत्ता सी. एस. नं. ८४१, लोअर परळ विभागावरील भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये असून, ही मालमत्ता सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (प.), मुंबई ४०००१३, मुंबई शहर व मुंबई नोंदणी जिल्ह्यात स्थित आहे.

दिनांक: १२ जुलै, २०२५

ॲडव्होकेट हर्षित शाह
बी१०१, शांतिनिकेतन, ३२२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड,
माटुंगा (पूर्व), मुंबई ४०००१९ इमेल : hdshah22@yahoo.com

जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती अधिकृत रहिवाशी पर्यावरण विषयक मंडळे एन. जी. ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते कि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. मेसर्स, सरोज लॅन्डमॉक एल एल पी. हबटाउन सोलारीस, ८०७-८०८, एन एस फाडके मार्ग, तेली गल्ली समोर, रेजेन्सी होटेल जवळ, अन्धेरी (पुर्व), मुंबई - ४०००६९. महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित योजना क्रमांक १ "गणेश नगर मागाठाणे रहिवाशी एसआरए सीएचएस लिमीटेड" सीटीएस क्रमांक १८२ (पैकी) आणि १९१ (पैकी) गावाच्या भूखंडावर मागाठाणे, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गणेश नगर, बोरिवली (पूर्व) मुंबई- ४०००६६. आणि योजना क्रमांक २ "सिद्धार्थ वेल्फेअर एसआरए सीएचएस (नियोजीत)" सीटीएस क्रमांक १८२ अ (पैकी), १८३ (पैकी) आणि १९१ (पैकी) गाव-मागाठाणे, गणेश नगर, बोरिवली (पूर्व) येथील टाटा पॉवर हाऊस, मुंबई- ४०००६६ आणि एस. आर. योजना क्रमांक ३ रेजि. ३३(११) अंतर्गत DCPR-2034 चे जय महाराष्ट्र नगर रोड क्रमांक 1, गाव- मागाठाणे, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०००६६ च्या सीटीएस क्रमांक १८१ अ असलेल्या भूखंडावर डीसीपीआरच्या रेजि. ३३ (११) अंतर्गत अतिरिक्त एसआर योजना क्रमांक ४ सह -२०३४ जय महाराष्ट्र नगर रोड क्रमांक १, गाव-मागाठाणे, बोरिवली (पूर्व) मुंबई - ४०००६६ च्या सीटीएस क्रमांक १८१ ई असलेल्या भूखंडावर जय महाराष्ट्र नगर रोड क्रमांक १, गाव-मागाठाणे, बोरिवली (पूर्व) मुंबई - ४०००६६.

महाराष्ट्राच्या खाली पत्र क्र. SIA/MH/INFRA2/403511/2022 दिनांक २३.०२.२०२३. सदर पत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन पर्यावरण अनुमती विभाग मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे त्याचप्रमाणे https://parivesh.nic.in/ या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या वेबसाईटवर पाहू शकता.

संचालक
मेसर्स. सरोज लॅन्डमॉक एल एल पी.
पत्ता - ८०७-८०८, एन एस फाडके मार्ग, तेली गल्ली समोर,
रेजेन्सी होटेल जवळ, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०००६९ .महाराष्ट्र.

स्थळ : मुंबई दिनांक : १२/०७/२०२५

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II

परि. क्र. १२

(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
एमटीएनएल बिल्डिंग, ३रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०० ००५.

मूळ अर्ज क्र. १०३८ सन २०२३

द कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. .....**अर्जदार**

विरुद्ध

मे. बेस्ट आयटी वर्ल्ड (इंडिया) प्रा. लि. आणि इतर. ....**प्रतिवादी**

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओ ए. क्र. १०३८ सन २०२३** नामदार पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१०/०१/२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ९,७१,४०,३४३.१५ (रूपये नऊ कोटी एकाहत्तर लाख चाळीस हजार तीनशे त्रेचाळीस आणि पंधरा पैसे मात्र)** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ज्याअर्थी समन्सच्या सेवेवर सामान्य पद्धतीने परिणाम होऊ शकत नाही आणि या माननीय न्यायाधिकरणाने बदली सेवेसाठी अर्ज करण्यास परवानगी दिली आहे.

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) **ज्याअर्थी,** वर उल्लेख केलेल्या अर्जदाराने या न्यायाधिकरणासमोर चालू आणि पुढील व्याज, खर्च आणि त्यात नमूद केलेल्या इतर सवलतींसह रकमेच्या वसुलीसाठी वर उल्लेखित अर्ज दाखल केला आहे.

(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **२२.०८.२०२५ रोजी स. ११.०० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे आणि **उप. प्रबंधक** यांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **०१ जुलै, २०२५** रोजी दिले.

प्रबंधक
कर्ज वसुली न्यायाधिकरण-II, मुंबई

प्रति,

१. श्री. विजय कुमार डालमिया,
प्रतिवादी क्र. ५,
ए-६०३, हायलँड पार्क, न्यू लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८.

२. श्री. संदीप सीताराम परसरामपुरिया,
प्रतिवादी क्र. ६,
२०१, टॉवर -२, रुस्तमजी ओझोन सीएचएस लि., एस. व्ही. रोड समोर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० ०६२.

३. मे. विजय डालमिया एचयूएफ, त्यांच्या कर्ता श्री. विजय कुमार डालमिया
प्रतिवादी क्र. ९,
ए-६०३, हायलँड पार्क, न्यू लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८
स्वतःसाठी आणि सदर एचयूएफच्या सह-भागीदारांच्या वतीने.

४. श्रीमती संगीता विजय डालमिया,
प्रतिवादी क्रमांक ९ (ए),
ए-६०३, हायलँड पार्क, न्यू लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८.

५. श्री. नीरज विजय डालमिया,
प्रतिवादी क्र. ९ (बी),
राहतात येथे ए-६०३, हायलँड पार्क, न्यू लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८.

६. श्री. देवांशू विजय डालमिया,
प्रतिवादी क्र. ९ (सी),
ए-६०३, हायलँड पार्क, न्यू लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८.

CUB TRUST AND EXCELLENCE SINCE 1904

सिटी युनियन बँक लिमिटेड

क्रेडीट रिकव्हरी ॲण्ड मॅनेजमेंट डिपार्टमेंट
प्रशासकीय कार्यालय : क्र. २४-बी, गांधी नगर,
कुंबकोणम-६१२ ००१, **ईमेल आयडी :** crmd@cityunionbank.in,
फोन : ०४३५-२४३२३२२, **फॅक्स :** ०४३५-२४३१७४६

सरफैसी ॲक्ट २००२ अन्वये निविदा-नि-लिलाव विक्री सूचना

खालील मिळकत/ती या **सिटी युनियन बँक लिमिटेड** कडे गहाण आहेत त्या कर्जदार/हमीदार **१) श्री. विनायक सिताराम शिंदे, सिताराम कृष्णा शिंदे यांचा मुलगा, क्र. २/५, सिधाम चाळ, उंबारली रोड, मानपाडा, रोड, साई धारा टॉवर जवळ, टिळकनगर, डोंबिवली पूर्व, ठाणे-४२१२०१. क्र. २) सौ. अर्चना विनायक शिंदे, विनायक सिताराम शिंदे यांची पत्नी, क्र. २/५, सिधाम चाळ, उंबारली रोड, मानपाडा, रोड, साई धारा टॉवर जवळ, टिळकनगर, डोंबिवली पूर्व, ठाणे-४२१२०१** यांचेकडून ०८.०४.२०२५ रोजीस **रु. २४,२६,५९९/- (रुपये चोवीस लाख सव्वीस हजार पाचशे नव्याण्णव मात्र)** सह एकत्रित ०९.०४.२०२५ पासून ते प्रभारीत होणारे पुढील व्याज आणि इतर खर्च, बँकेकडे इतर थकबाकीच्या वसुलीकरिता सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) व ९ अंतर्गत बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे निविदा-नि-जाहीर लिलावाने विकण्यात येणार आहे.

आमच्या बँकेकडे गहाण असलेली स्थावर मिळकत
(श्री. विनायक सिताराम शिंदे, सिताराम कृष्णा शिंदे यांचा मुलगा आणि सौ. अर्चना विनायक शिंदे, विनायक सिताराम शिंदे यांची पत्नी यांच्या मालकीची मिळकत)

फ्लॅट क्र. ४०१, ४ था मजला, क्षेत्र मोजमापित ६३० चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र, कृष्णा रेसिडन्सी, सर्व्हे क्र. १, हिस्सा क्र. १ए भाग, गाव सोनारपाडा, तालूका कल्याण, जिल्हा ठाणे. मिळकतीच्या सीमा: पूर्व: रोड, पश्चिम: सरस्वती विद्या भवन रोड, उत्तर: सरस्वती विद्या भवनचे कंपाऊंड, दक्षिण: आई माताजी मंदिर.

राखीव किंमत : रु. २५,००,०००/-
(रुपये पंचवीस लाख मात्र)

लिलावाचा तपशील

पुनर्निविदा नि लिलाव विक्रीची तारीख	ठिकाण
०२.०८.२०२५	**सिटी युनियन बँक लिमिटेड, मुंबई-कल्याण शाखा,** १-ई, रामकृष्ण नगर, मुरबाड रोड, कल्याण पश्चिम, मुंबई, ठाणे - ४२१३०४. दूरध्वनी क्र. ०२५१-२२०३२२२, सेल क्र. ९३२५०५४२५२.

निविदा-नि-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती :

(१) इच्छुक बोलीदाराने लिलावाकरिता व्यक्तिश: हजर राहणे आणि व्यक्तिश: सहभागी होणे आणि तो/ती स्वतः करिता बोली करीत असल्याची लेखी घोषणा करणे आवश्यक आहे. **(२)** इच्छुक बोलीदार **व्यवस्थापक, सिटी युनियन बँक लिमिटेड, मुंबई-कल्याण शाखा, १-ई, रामकृष्ण नगर, मुरबाड रोड, कल्याण पश्चिम, मुंबई, ठाणे - ४२१३०४** यांचेकडून निविदा प्रपत्र प्राप्त करू शकतात. **(३)** इच्छुक बोलीदाराने याद्वारे अधिसूचित केल्यानुसार निविदा-नि-लिलाव विक्रीच्या तारखेस **दु. १२.०० वा. किंवा पूर्वी ''सिटी युनियन बँक लिमिटेड''** च्या नावे काढलेल्या राखीव किंमतीच्या **१०%** च्या इअरकरिता पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्टसह एकत्रित **प्राधिकृत अधिकारी, सिटी युनियन बँक लिमिटेड** यांच्या नावे मोहोरबंद लिफाफ्यातूनच फक्त विहित निविदा प्रपत्रातून त्यांच्या बोली सादर करणे आवश्यक आहे. **(४)** मिळकतीचे निरीक्षण आणि इतर तपशिलाकरिता इच्छुक खरेदीदार **टेलिफोन क्र. ०२५१-२२०३२२२, सेल क्र. ९३२५०५४२५२** वर संपर्क करू शकतात. **(५)** मिळकत/ती ''जे आहे जेथे आहे'' आणि ''जे आहे जसे आहे'' तत्त्वाने विकण्यात येतील. **(६)** मोहोरबंद निविदा याद्वारे अधिसूचित केल्यानुसार निविदा-नि-लिलाव विक्रीच्या तारखेस **दु. ०१.०० वा.** इच्छुक बोलीदारांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. विक्री बंद निविदेच्या मागणि होणार असली तरीही प्राधिकृत अधिकारी त्यांच्या स्वतःच्या निर्देशाने निविदा लिलाव प्रक्रिया बंद होतेवेळी प्राप्त एकापेक्षा उच्चतम बोलीचा प्रस्ताव देण्यास इच्छुक बोलीदारांच्या दरम्यान खुला लिलाव करतील आणि त्यानंतर उच्चतम बोली करणाऱ्या व्यक्तीला विक्री निश्चित करण्यात येईल. तथापि, विक्री, सिटी युनियन बँक लिमिटेडच्या निश्चितीच्या अधीन राहील. **(७)** यशस्वी बोलीदाराने विक्री पूर्ण झाल्यानंतर **त्वरित** विक्री रकमेच्या **२५% (भरलेली इअर धरून)** आणि **७५%** ची उर्वरित रक्कम विक्री निश्चितीच्या तारखेपासून **१५ दिवसांत** जमा करणे आवश्यक आहे, कसूरवार ठरल्यास अगोदर जमा केलेली **२५%** रक्कम जप्त करण्यात येईल. **(८)** विक्री प्रमाणपत्र हे येथील विहित कालावधीत संपूर्ण विक्री मोबदला प्राप्त झाल्यानंतर फक्त यशस्वी खरेदीदाराच्या नावे प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यात येईल. **(९)** यशस्वी खरेदीदाराने कायद्यानुसार प्रयोज्य मुद्रांक शुल्क, नोंदणी प्रभार इ. असे अभिहस्तांतरणाकरिता देय प्रभार/शुल्क भरायचे आहेत. **(१०)** यशस्वी बोलीदाराने काही असल्यास सांविधिक थकबाकी (कायदेशीर घराचा कर, वीज प्रभार आणि अन्य थकबाकी), टीडीएस, जीएसटी काही असल्यास, शासन, शासकीय उपक्रम, स्थानिक मंडळाची थकबाकी भरायची आहे. **(११)** प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे कोणतेही कारण न देता बोली स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा विक्री पुढे ढकलणे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार राहतील.

ठिकाण : कुंबकोणम, दिनांक : १०-०७-२०२५ **प्राधिकृत अधिकारी**

नोंद. कार्यालय : १४९, टी.एस.आर. (बीग) स्ट्रीट, कुंबकोणम, थंजावूर जिल्हा, तामिळनाडू - ६१२ ००१, **सीआयएन -** एल६५११०टीएन१९०४पीएलसी००१२८७, **टेलिफोन क्र.** ०४३५-२४०२३२२, **फॅक्स :** ०४३५-२४३१७४६, **वेबसाईट :** www.cityunionbank.com

---

SBI State Bank of India

एसएआरबी ठाणे (११६९७) शाखा:- १ला मजला, केरोम प्लॉट क्र. ए-१११ सर्कल, रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (प) ४००६०४, **ईमेल आयडी:** sbi.